

पाच मे चा उत्सव



लिंडा लोवी

मराठी: अश्विनी बर्वे


पाच मे चा उत्सव



लिंडा लोवी

चित्र: बारबरा नटसन






रंगीत डबे गोड गोळ्यांनी भरलेले आहेत.

आतिशबाजी होत होती.

गल्लीत नाच गाणी चालू होती.

ते काय चालू आहे?

तो **सिन्को डे मेयो चा उत्सव आहे**!



सिन्को डे मेयो (Cinco de Mayo) मे चा पाचवा दिवस आहे.

अमेरिका आणि मेक्सिकोमध्ये तो एक उत्सवाचा दिवस आहे.


हा उत्सवाचा दिवस प्रत्येकजण आनंदाने साजरा करतो.

सिन्को डे मेयोच्या दिवशी लोक त्या अद्‌भुत लढाईची आठवण काढतात जी १०० वर्षापूर्वी झाली आहे.

सिन्को डे मेयोची कहाणी एका साहसाची कहाणी आहे.

ती मेक्सिकोच्या सैनिकांची कहाणी आहे ज्यांनी पृथ्वीवरच्या सर्वात ताकदवर सैन्याला हरवून इतिहास बदलला.

ती मेक्सिको आणि अमेरिकेच्या लोकांची एकमेकांबरोबर काम करण्याची कहाणी आहे.



दोन राष्ट्रपती आणि एक सम्राट १८६१

मेक्सिको युद्धामुळे थकला होता.

शेकड़ों वर्षे, स्पेनने मेक्सिकोवर शासन केले होते.

अनेक मेक्सिकन लोकांनी स्पॅनिश लोकांपासून सुटका मिळवण्यासाठी लढलेल्या लढाईत आपले प्राण गमावले.

१८२१ मध्ये स्पॅनिश निघून गेले.

१८४० च्या दशकामध्ये, मेक्सिको आणि अमेरिकेच्या मध्ये एक नवीन युद्ध छेडले गेले.

त्यात मेक्सिकोने आपली अर्धी जमीन गमावली.

१८६१ मध्ये, शेवटी मैक्सिकन लोक स्वतंत्र झाले.

आता त्यांचा एक मैक्सिकन राष्ट्रपती होता.

त्यांचे राष्ट्रपती, जैपोटेक नावाच्या इंडियन जमातीतून आले होते.

त्यांचे नाव बेनिटो जुआरेज़ होते.

बेनिटो मेक्सिकोचे पहिले इंडियन होते जे राष्ट्रपती झाले होते.

ते खूप गरिबीच्या परिस्थितीत मोठे झाले होते.

ते एक अनाथ होते.

ते आपल्या काकाच्या इथे गुरे चरण्याचे काम करत असत.


मग बेनिटो यांनी खूप अभ्यास केला.
ते कॉलेजमध्ये गेले आणि वकील झाले.

१८६१ मध्ये, बेनिटो जुआरेज मेक्सिकोचे राष्ट्रपती झाले.

त्यांनी सिद्ध केले की एक गरीब गुरे चारणारा पण शिक्षित होऊ शकतो आणि मोठा होऊन देशाचे नेतृत्व करू शकतो.

बेनिटो यांना आशा होती की मेक्सिको आणि अमेरिका दोस्त होतील..

त्यांनी अमेरिकेच्या राष्ट्रपतीला पत्र लिहण्यास सुरुवात केली.



त्याकाळी अब्राहम लिंकन अमेरिकेचे राष्ट्रपती होते.

बेनिटो जुआरेजचे पत्र मिळाल्यावर ते खूप खुश झाले.

अब्राहम लिंकन आणि बेनिटोमध्ये खूप समानता होती.

लिंकन यांचासुद्‌धा जन्म गरिबीत झाला होता.


ते एका छोट्‌या घरात मोठे झाले.

त्यांनी खूप अभ्यास केला आणि मग ते एक वकील झाले.

आता अब्राहम लिंकन आपल्या देशाचे नेतृत्व करत होते, पण त्यांच्या समोर अजून एक युद्‌ध होते. उत्तरेकडचे राज्य, दक्षिणेकडच्या राज्यांशी लढत होते.

या युद्‌धाला गृहयुद्‌ध म्हणतात. लिंकन खूप काळजीत होते.

त्यांना माहीत होते की फ्रान्सचा सम्राट, दक्षिणेला सहाय्य करण्यासाठी सैनिक आणि हत्यारे पाठवण्याचा विचार करत आहेत.



फ्रान्सच्या मदतीने कदाचित दक्षिणेकडचे राज्य, गृहयुद्‌ध जिंकले असते.

मग संयुक्त राज्य अमेरिका, दोन देशांमध्ये विभागले गेले असते.

फ्रान्सच्या सम्राटाचे नाव तिसरा नेपोलियन होते. त्यांचे सैन्य सर्व जगात श्रेष्ठ होते. त्यांच्या सैनिकांची वर्दी एकदम नवी होती. त्यांचे लांब बूट एकदम चमकदार होते. त्यांचे हत्यारे घातक होते.

नेपोलियन खूप लालची होता.

त्याला पूर्ण लॅटिन अमेरिकेवर शासन करायची इच्छा होती.

त्यालाही वाटत होते की दक्षिणेकडच्या राज्यांनी गृहयुद्ध जिंकावे.

तेव्हा मग संयुक्त राज्य अमेरिका कमजोर होईल.

आणि फ्रान्स, दुनियेतला सगळ्यात ताकदवान देश होईल.

नेपोलियनने मेक्सिकोवर हमला करण्याचा आणि त्यावर कब्जा करण्याचा निर्णय घेतला.

तेव्हा तो दक्षिणेच्या मदतीसाठी आपली सेना सीमेपार घेऊन जाऊ शकत होता.

त्यामुळे राष्ट्रपती लिंकन चिंतित होते.

आणि राष्ट्रपती बेनिटो जुआरेज़पण चिंतेत होते.

त्यांना माहीत होते की जर त्यांच्या देशाला स्वतंत्र राहायचे असेल तर त्यांना मिळून काम करण्याची गरज आहे.





प्यूब्लाची लढाई

फ्रांन्स सैनिकांनी भरलेले जहाज, समुद्र पार करून आले.

१८६१ च्या शेवटी त्यांनी अटलांटिक महासागर पार केला.

ते मेक्सिकोमध्ये वेराक्रूज़ नावाचा बंदरावर उतरले.

तिसऱ्या नेपोलियनने आपल्या सैनिकांना, मेक्सिको सिटीवर हमला करण्यास सांगितले.

मेक्सिको सिटी, मेक्सिकोची राजधानी होती.

तिथे बेनिटो जुआरेज़ आणि त्यांच्या सरकारचे घर होते.

रस्त्यात फ्रेंच सैनिक, एका गावात खाण्यासाठी आणि झोपण्यासाठी थांबले.

मैक्सिकन लोक, फ्रेंच सैनिकांना घाबरत होते.

म्हणून रस्त्यात फार कमी लढाई झाली.

फ्रेंच सैनिकांना वाटले की मैक्सिकन भित्रे आहेत.

बेनिटो जुआरेज़ यांना माहीत होते की त्यांचे लोक भित्रे नाहीत. त्यांचे लोक लढता लढता थकले आहेत एवढेच. पण आता त्यांना काही करायचे होते.

बेनिटो यांना माहीत होते की नेपोलियन त्यांच्या जागी कोणीतरी फॅन्सी यूरोपीय राजकुमार आणू इच्छितो. त्यामुळे मैक्सिकन लोकांना मुक्ती मिळाली नसती.

नेपोलियन, फ्रान्ससाठी मेक्सिकोचे सोने-चांदी सुद्धा लुटू बघत होता.


सगळ्यात वाईट गोष्ट ही होती की तो मेक्सिकन जीवन-शैलीवर बंधने घालू इच्छित होता.

पण बेनिटो जुआरेज़ शेवटी काय करू शकत होते?

सैनिकांना प्रशिक्षित करण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नव्हते. हत्यारे आणि बंदुकीच्या गोळ्या खरेदी करण्यासाठी त्यांच्याकडे धन नव्हते.

फ्रेंचांना रोखण्यासाठी बेनिटो फक्त एक छोटीशी सेना पाठवू शकत होते.

दोन्ही सेना मेक्सिको सिटीच्या पूर्वेला असणाऱ्या एका शहरात प्यूब्लामध्ये भेटणार होत्या.



मेक्सिकोवासियांकडे फक्त 3,000 सैनिक होते.

तर फ्रेंच सैनिक त्यांच्यापेक्षा दुप्पट ६००० होते.

मैक्सिकन सैन्यांनी शेतकऱ्यांकडे मदत मागितली.


शेतकऱ्यांना कैम्पेसिनो म्हटले जाई.

ते पेंढ्याची (वाळलेल्या गवताची) टोपी आणि घरी तयार केलेली चप्पल घालत असत.

त्यांच्याजवळ हत्यार म्हणून केवळ शेतीसाठी लागणारे फावडे आणि धान्य कापण्यासाठी लागणारे चाकू होते.

पण मेक्सिकन लोकांसाठी एक खूप महत्वपूर्ण ताकद होती.

त्यांचे ह्रदय या युद्धात होते. ते फक्त आपल्या सोन्या चांदीच्या खजिन्याची रक्षा करत नव्हते. ते आपल्या घराची आणि आपल्या परिवाराची सुद्धा रक्षण करत होते. ते आपल्या परंपराची रक्षण करत होते. ते त्या सगळ्या मुलांचे रक्षण करत होते जे मोठे होऊन मैक्सिकन होणार होते.





यामध्येच फ्रेंच सेना सकाळी कॉफी पिण्यासाठी थांबली. त्यांना मैक्सिकोच्या कोणत्याही गावामध्ये काहीच त्रास आत्तापर्यंत झाला नव्हता. मग त्यांना प्यूब्लामध्ये काय त्रास होईल?

त्यांना माहीत होते की तिथे एक दयनीय छोटीशी सेना त्यांची वाट बघत असेल. फ्रेंच सैनिकांसाठी ती लढाई सोप्पी असेल.

तो ५ मे १८६२ चा दिवस होता - एल सिन्को डे मेयो.


मैक्सिकन सेनेला माहीत होते की फ्रान्सने त्या दिवशी पुएब्लावर हल्ला करण्याची योजना तयार केली आहे.

म्हणून पहाटेच्या वेळी चर्चची घंटा जोरात वाजू लागली.

कैंपसिनोनी फावड़े आणि धारदार चाकू आपल्या हातात उचलले ज्याला “माचेस” म्हटले जाते.

ते मैक्सिकन सैनिकांबरोबर लढण्यासाठी निघाले.

प्यूब्लाच्या दोन किल्ल्यांजवळ काही शेतकरी आणि काही सैनिक लपून बसले.





साहसपूर्वक, फ्रेंच सैनिकांनी किल्ल्यावर हल्ला केला. त्यांनी मेक्सिकन लोकांना गोळी मारण्यासाठी दगडाच्या भिंती तोडाव्या लागल्या.

मेक्सिकन लोकांनी परत गोळ्या मारल्या. त्यामुळे शेकडो फ्रेंच सैनिक घायाळ होऊन खाली पडले.

मग अजून फ्रेंच सैनिक भिंतीवर चढू लागले. त्या जवानांना सुद्धा मेक्सिकन्स लोकांनी गोळ्या मारल्या.

घाईने फ्रेंचांनी आपल्या अधिकांश गोळ्या आणि तोफांचा उपयोग केला होता.

मैक्सिकनची छोटी सेना फ्रेंच सैनिकांना आता पिटत होती. हे कसे शक्य झाले?

अचानक आकाशात गडगडाट झाला.


वीज कडाडली आणि जोरात पाऊस पडू लागला. फ्रेंचांचे घोडे चिखलात घसरू लागले. तेव्हा लपलेल्या मेक्सिकन शेतकऱ्यांनी उड्या मारल्या आणि गोळ्या मारल्या.


शेतकऱ्यांनी आपले चाकू घेतले आणि आसपासच्या गुरांना हाकलायला सुरुवात केली.

गुरांनी चिखलात घसरणाऱ्या फ्रेंच सैनिकांवर हमला केला.

उशिरा दुपारपर्यंत फ्रेंच लढाई हरले.

मग ते वळले आणि परत पूर्वेकडे निघाले.





पुएब्लामध्ये, रात्रभर चर्चमधल्या घंटा वाजत राहिल्या.

मैक्सिकन शेतकऱ्याच्या मदतीने मैक्सिकन सैनिकांनी आपल्यापेक्षा दुप्पट मोठ्या सेनेला हरवले.

त्यांनी एका अशा सेनेला हरवले होते ज्या सेनेने अनेक वर्षानपासून एकही लढाई हरली नव्हती.

बातमी मिळताच बेनिटो जुआरेज यांनी विजय घोषित केला आणि राष्ट्रीय उत्सव घोषित केला.


सिन्को डे मेयो नंतर, अनेक मेक्सिकन लोकांनी स्वतःकडे एका नवीन पद्धतीने बघितले.

लोक ओरडले.“ मी मैक्सिकोचा निवासी आहे!"

आता त्यांना मैक्सिकन असण्याचा गर्व होता.

आता ते आक्रमण करणाऱ्यांच्या विरोधात शक्तिहीन नव्हते.

ते आपल्या देशावर शासन करण्यासाठी तयार होते.



मैक्सिकन लोकांना त्या दृढ़ संकल्पाची गरज होती.

मग नेपोलियनने अजून ३०००० फ्रेंच सैनिक मेक्सिकोला पाठवले..

तीन वर्षापर्यंत मैक्सिकन, फ्रेंच सैनिकांशी झुंझत राहिले.

त्याकाळात ही, दरवर्षी पाच मे ला मैक्सिकन लोक उत्सव साजरा करण्यासाठी वेळ काढला.

त्यांनी पुएब्ला मधला आपल्या विजयाची गर्वाने आठवण ठेवली.

त्या पर्वाने त्यांना धाडसी राहण्याची आणि आपल्या हृदयापासून, एका स्वतंत्र मेक्सिको साठी लढण्याची आठवण दिली.

त्या काळात, संयुक्त राज्य अमेरिकेमध्ये गृहयुद्ध चालू राहिले.

दक्षिण, गरीब आणि कमजोर होत गेला.

फ्रान्स, दक्षिणेच्या राज्यांना मदत करू शकला नाही.

मेक्सिकोवर नियंत्रणठेवण्यासाठी नेपोलियनने अधिक सैनिक, घोड़े, धान्य आणि हत्यार पाठवले.

म्हणून फ्रान्सजवळ दक्षिण राज्यांसाठी काही अतिरिक्त पैसा राहिला नाही..

या दरम्यान, राष्ट्रपती लिंकन आणि राष्ट्रपती जुआरेज़ सतत संपर्कात राहिले.

जसे शक्य झाले, अब्राहम लिंकन यांनी मेक्सिकोसाठी बंदुका आणि गोळ्या पाठवल्या.

१८६५ मध्ये जेव्हा गृहयुद्ध समाप्त झाले, तेव्हा लिंकन यांनी आपल्या सैनिकांना सीमेवर लढण्यासाठी पाठवले.

त्यामुळे नेपोलियन चिंतित झाला.


संयुक्त राज्य अमेरिका, मेक्सिकोच्या बरोबर उभी राहिली.



नेपोलियनला हे युद्ध चालू ठेवायचे होते का?

नाही, निर्णय झाला. शेवटी १८६७ मध्ये फ्रेंच सैनिकांनी मेक्सिको सोडले.

मग कधी कोण यूरोपीय सेनेने, अमेरिकेवर आक्रमण केले नाही.





उत्सव किंवा पार्टी

५ मे १८६२ पासून, मैक्सिकन आणि अमेरिकी चांगले शेजारी झाले आहेत.

त्याचबरोबर त्यांनी अनेक युद्धात मिळून स्वातंत्र्याच्या लढाया लढल्या आहेत.

प्रत्येक वर्षी,सीमेच्या दोन्ही बाजूला लोक सिन्को डे मेयो पर्व साजरा करतात..

सगळ्यात मोठा उत्सव पुएब्ला, मेक्सिको मध्ये होतो.

लोक लवकर उठतात आणि सिन्को डे मेयो मध्ये, हीरोच्या बुलेवार्ड वर जातात.


तिथे, ते परेड बघण्यासाठी खुर्च्या भाड्याने घेत असत. तिथे खूप आवाज आणि गर्दी होती.

झांकीमध्ये सूरज नाव चालवत असे. गोळ्या,साबणाचे फुगे आणि दुर्बीण विकतांना व्यापारी ओरडत होते.

"सोम्ब्रेरो!" ते ओरडतात. “गवताच्या टोप्या!”

सगळीकडे चमकणाऱ्या रंगाच्या कागदाच्या छत्र्या होत्या.

फुगे विकणारे फुग्यांचे मोठे मोठे ढग घेऊन येतात.





दुपारपर्यंत परेड सुरु होती.

विविध रंगाचे कपडे मैक्सिकोचा इतिहास दर्शवतांना गर्वाने पुढे जात आहे.

स्कूल बैंड असे गाणं वाजवतात ज्याचा त्यांनी महिनाभर अभ्यास केला आहे.

सैनिक, सरळ रांगेत मार्च करतात.

मुले, शेतकऱ्यांसारखे कपडे घालतात. ते चाकू आणि फावड़े घेऊन चालतात. लोक टाळ्या वाजवतात आणि रंगबेरंगी रिबिनी झळकवतात.

ते परेडवर गुलाबी, नीळे, हिरव्या, जांभळ्या आणि पिवळ्या रंगाच्या कागदाचे चमकणारे तुकडे उधळतात.

त्या रात्री प्रसिद्ध युद्धाच्या मैदानावर एक शो होता.


लोक सैनिकासारखे तयार होतात आणि पुएब्लाची लढाईचे प्रदर्शन करतात.

ते गोळ्या आणि तोफांच्या गोळ्यांचा उपयोग करत नाही.

त्याशिवाय ते एकदुसऱ्यावर फुले टाकतात.

ते रंगांनी भरलेल्या अंड्याची टरफल फेकतात.

प्यूब्लाच्या किल्ल्यांवर आकाशातून आतिषबाजी करत असत.





संयुक्त राज्य अमेरिकेत सिन्को डे मेयो, एक मोठा उत्सव मानला जातो.

पण नेहमी असे नसे. १९६०च्या दशकात, मैक्सिकन-अमेरिका आपली संस्कृती एकमेकांबरोबर साजरी करतात.

त्यांना आपण मेक्सिकनमुळांवर गर्व होता.

त्यांनी सिन्को डे मेयोचा उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली.

त्यांनी शेजाऱ्यांना मौज करण्यासाठी बोलावले. आता अमेरिकेतल्या सर्व शहरांमध्ये ५ मे ला परेड आयोजित केली जाते. काही लोक मैक्सिकोचे लाल, सफेद आणि हिरव्या रंगाच्या झेंड्याचे कपडे घालतात.

इतर लोक मेक्सिकोच्या विभिन्न राज्यांतील पारंपरिक पोशाख घालत.



परिवार पारंपरिक मेक्सिकन पदार्थ वाढतात.

लोक “टैकोस” आणि “एनचिलाडस” आणि मसालेदार स्नैक्स खातात.


सगळ्यात प्रसिद्ध पदार्थामध्ये एक, ज्याला "मोल" म्हटले जाते तो सरळ पुएब्लाहून येतो.

तो ४० प्रकारच्या पदार्थांपासून तयार केलेली चटणी असते. ज्यात मिरची, मसाले आणि चॉकलेट मिसळलेले असते.

मुले गोड गोळ्या, फळं आणि छोट्या छोट्या खेळण्यांनी भरलेले कागदाचे डबे फोडतात.

लोक संगीतवादकांनी वाजवलेल्या गिटारवर आणि सनईवर नाच करतात. दिवस आतिषबाजी, लेजर लाइट-शो आणि संगीत कार्यक्रमांच्यासाथीने संपतो.





सिन्को डे मेयोच्या दिवशी मैक्सिकन आणि अमेरिकी लोक बरोबर उत्सव साजरा करतात.

ते त्या छोट्या सेनेच्या आठवणीत उत्सव साजरा करतात जिने शत्रूच्या मोठ्या सैन्यावर विजय मिळवला होता.

लोक मैक्सिकन जेवण आणि इतिहास आणि संगीत यांचा उत्सव साजरा करतात.

लोक चांगले शेजारयासाठी उत्सव साजरा करतात.

एल सिन्को डे मेयो! चिरायु होवो.

सिन्को डे मेयो, जिंदाबाद!

स्पेनिश शब्द

campesinos कैम्पेसिनो (KAHM-Pay-SEE-nohs): कृषि मज़दूर

Cinco de Mayo सिन्को डू मेयो (SEENK-Oh DAY MY-Oh): मे चा पाचवा दिवस

fiesta : एक उत्सव किंवा पार्टी

machetes (mah-CHEH-tays): शेतात पीक कापण्यासाठी लागणारा मोठा चाकू

mariachi (MAHR-ee-AH-chee): असा संगीतकार जो एक पारंपरिक मैक्सिकन पोषाख घालत असे आणि एका बैंडमध्ये उत्सव संगीत वाजवत असे.

mole (मोह-ले): मांस आणि मैक्सिकन व्यंजनसाठी लागणारी एक मसालेदार चटणी

pinatas (पीन-आताहस): रंगीत कागदाचे डबे ज्यात खेळणी आणि गोळ्या भरलेल्या असत, जे उत्सवात मुले फोडत.

serapes (सेहर-ऑ-पेज़): खांद्यावर घातला जाणारा लोकरीचा डगला

sombreros (सोम-ब्रेह-रोहस): टोपी जी कापडापासून किंवा गवतापासून तयार केलेली असते आणि ती नेहमी रुंद असते.